**अमरावती महानगरपालिका, अमरावती**

**दिनांक ६.२.२०२३रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ५६ -** प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ४ (BLC) अंतर्गत केंद्र शासनाकडून मंजुर प्रकल्प क्र. १ (DPR-I) लाभार्थी संख्या ३५६१ मधील लाभार्थी वगळणे बाबत प्रस्ताव राज्य शासनास मंजुरी करीता सादर करणे बाबत.

**संदर्भ -** मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. नपप्रस/प्र.क्र./४१९७/२०२२/का.७ दि. २७/०९/२०२२.

**ठराव क्रमांक ५६ -** अमरावती मनपा हद्दीत प्रकल्प क्र. १ (DPR-1) लाभार्थी संख्या ३५६१ ला केंद्र शासनाकडून दिनांक ०७/०२/२०१८ रोजी मंजुरी मिळाली आहे. शासन निर्णयातील व प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार अमरावती मनपा हद्दीत केवळ दिनांक ०४/११/२०२२ पर्यंत १५११ लाभार्थ्यांनी घरकुल नकाशा मंजुर करुन घरे पूर्णत्वास नेली आहेत. उर्वरित २०५० लाभार्थ्यांकडे या विभागा तर्फे घरकुलाचा नकाशा मंजुर करुन अनुदानाचा लाभ घेणे करिता वारंवार पाठपुरावा केला असून घरकुल नकाशास मंजुरी प्राप्त केली नाही करीता सदर २०५० लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजनेकरीता अपात्र ठरतात.

प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ४ (BLC) अंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर प्रकल्प क्र. १ (DPR-I) लाभार्थी संख्या ३५६१ मधील लाभार्थी वगळणे बाबतच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान करणे करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.